**CNR NO- MHSO060013272023**

विशेष दिवाणी दावा क्र. २८५/२०२३
दादा गेळे.
वि.
चंद्रकांत होनमाने.

## नि.क्र.३० वरील आदेश
## (घोषित दि.११/१०/२०२४)

०१] प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्तीच्या परवानगीकरीता दाखल करण्यात आलेला आहे.

०२] प्रतिवादीतर्फे अर्जास विरोध करुन योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०४] माझे समोर पुढील मुद्दे उपस्थित होतात त्यावर माझे असलेले निष्कर्ष व त्याकरीता असलेली कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १] | वादी विनंती केल्यानुसार दाव्यामध्ये दुरुस्ती करुन मिळणेस पात्र आहे काय ? | होय |
| २] | अंतिम आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात आला. |

### कारणमिमांसा

मुद्दा क्र. १ बाबतः-

०५] प्रस्तुतचा दावा करार पूर्ततेकरीता तथा कब्जे करीता दाखल करण्यात आलेला असून विकल्पेकरुन इसाराची रक्कम परत मिळण्याची विनंती करण्यात आलेली आहे. वादीचे म्हणणेनुसार एकुण व्यवहार ९०,००,०००/- रुपयांना ठरलेला असून त्यापैकी ६८,६४,०००/- रुपये इसार म्हणून प्रतिवादीला देण्यात आलेले आहेत ज्याचे विवरण वादपत्रात परिच्छेद क्र. ५(अ) मध्ये देण्यात आलेले आहे. सदर विवरण नमुद करताना दि.१०/०२/२०२१ रोजी प्रतिवादी क्र.२ च्या खात्यात रु.२०,००,०००/- वर्ग केल्याचे टंकलिखीत करण्यात आले आहे परंतु सदर

टंकलेखनाची चूक असून ती रक्कम रु.३०,००,०००/– अशी आहे. एकुणच वादीचे कथनानुसार परिच्छेद क्र. ५(अ) मध्ये टंकलेखनाच्या चूकीमुळे सदरची चूक झालेली असून त्याकरीता वादीला दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

०६] परिच्छेद क्र. ५(अ) मध्ये रक्कम रु.६८,६४,०००/– चे देण्यात आलेले विवरण तपासून पाहिले असता असे दिसून येते की, वादीच्या म्हणण्यामध्ये तथ्य असून सदरची रक्कम रु.३०,००,०००/– असणे अपेक्षित असताना टंकलेखनाच्या चूकीमुळे रु.२०,००,०००/– असे नमुद झालेले आहे. निश्चितपणे दाव्याचे स्वरुप व त्यामध्ये करण्यात आलेली वैकल्पीक मागणी लक्षात घेता सदरची दुरुस्ती मंजूर करणे योग्य आहे. सदरची दुरुस्ती उभयपक्षांतील वाद कायमस्वरुपी संपुष्टात आणण्याकरीता आवश्यक असून प्रस्तावीत दुरुस्ती मंजूर झाल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होत नाही करीता वादीने केलेल्या विनंतीनुसार दुरुस्ती मंजूर होवून मिळण्यास पात्र असल्याचे माझे मत झालेले आहे. करीता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देतो.

मुद्दा क्र. २ बाबतः-

०७] वरील सर्व विवेचनावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१] अर्ज मंजूर करण्यात येतो.

२] वादीने विहीत मुदतीत दाव्यात दुरुस्ती करावी व दुरुस्ती वादपत्र पुढील तारखेपावेतो सादर करावे.

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2024.10.11 16:41:19 +0530

**दि. ११/१०/२०२४.**

**(अमित अ.खंडाळे)**
**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपूर.**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 11.10.2024 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 11.10.2024 |
| Judgment/Order uploaded on | : | 11.10.2024 |